महत्वाचे/तात्काळ/कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/उमाशि/११वी प्र.प्रक्रिया १३-१४/पुवि/१३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
दि. २३ /०८/२०१३.

प्रति,

**सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य,**
**इ.११ वी केंद्रिय प्रवेश प्रक्रिया**
**पध्दतीतील समाविष्ठ कनिष्ठ**
**महाविद्यालय, पुणे/पिंपरी चिंचवड शहर,पुणे.**

**विषयः- इ.११ वी केंद्रिय प्रवेश प्रक्रिया सन २०१३-१४**

मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे समवेत दि.१३.०८.२०१३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने जे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित होते व ज्या मुलींना १० ते १५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावरच्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळालेला होता, त्यांचा विचार करुन प्राप्त झालेल्या अर्जांनुसार दि.२१ ऑगस्ट व दि.२३ ऑगस्ट २०१३ रोजी या कार्यालयाने त्यांना आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात नव्याने प्रवेश बदलून दिला आहे. सदरच्या यादया या कार्यालयाने विद्यार्थ्यांना बघण्यासाठी प्रसिध्द केल्या आहेत. तथापी आपल्या व विद्यार्थ्यांच्या अवलोकनार्थ सदर प्रवेशाबाबतची कनिष्ठ महाविद्यालय निहाय प्रवेश यादी या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रसिध्द केलेल्या यादोत विद्यार्थ्यांच्या नावासमोर आपले कनिष्ठ महाविद्यालय दर्शिविले असेल तर संबंधित यादीतील विद्यार्थ्यांना तात्काळ आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश दयावा, प्रवेश दिल्याबाबतचा तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा . कोणत्याही कारणास्तव सदरच्या यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारुन या कार्यालयाकडे परत पाठवू नये.प्रवेश देतांना विद्यार्थ्यांची सर्व मूळ शैक्षणिक कागदपत्रे / प्रमाणपत्रे तपासूनच प्रवेश देण्यात यावा. सदर प्रवेश प्रक्रिया प्रकरणी आपणांस या कार्यालयामार्फत वेगळे आदेश अथवा प्रवेश यादी पाठविली जाणार नाही, त्यासाठी या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीनुसार आपण तात्काळ प्रवेशाबाबतची योग्य ती कार्यवाही करावी याची आपण नोंद घ्यावी.

सचिव,
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
**सहाय्यक शिक्षण संचालक**
**पुणे विभाग, पुणे १**

साळुंखे / आफीस लेटर